# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक गा–हाणे निवारण मंच
# नागपूर शहर परिमंडळ, नागपूर.

---

## केस क्रं. ग्रागानिमं/नाशप/०२८/२०१०

अर्जदार : श्री शेख नसिर उस्मान कुरेशी
राहणार कुजबा
तहसिल कुही
जिल्हा नागपूर.

– विरूध्द –

गैरअर्जदार : कार्यकारी अभियंता,
विभाग क्रंमाक 1, नाशप,
म.रा.वि.वितरण कंपनी मर्या,
नागपूर.

गणपूर्ती : 1) श्रीमती मीरा खडक्कार
सभापती,
ग्राहक गा–हाणे निवारण मंच
नाशप, नागपूर.

2) श्री डी. जी. गावनार
कार्यकारी अभियंता तथा
सदस्य–सचिव,
ग्राहक गा–हाणे निवारण मंच
नाशप, नागपूर.

3) श्रीमती गौरी चांद्रायण,
सदस्या
ग्राहक गा–हाणे निवारण मंच,
नाशप, नागपूर.

— आदेश ——

पारीत दि. १९.०४.२०१०

ग्राहक गा–हाणे निवारण मंचात अर्जदार यानी तक्रार अर्ज दिनांक १०.०३.२०१० रोजी म.राज्य विज नियामक आयोग (ग्रागानिम व विद्युत लोकपाल) विनियम 6.4 विनियम 2006 प्रमाणे दाखल केलेला आहे.

अर्जदाराचा गा—हाण्याचा तपशील :—

1) अर्जदाराने सदर तक्रार अर्ज त्याचा मालकीच्या प्लॉटवरील विजेच्या पुरवठयाची वायर काढुन दुसरीकडे देण्याकरीता केलेला आहे.

अर्जदार हा मौजा कुजबा येथील रहीवासी असुन त्याच्या शेजारी प्लॉटवर पिठगिरणी करीता विद्युत जोडणी दिलेली आहे त्या विज पुरवठयाची वायर तक्रारकर्त्याच्या प्लॉटवरून जात असल्याने तक्रारकर्त्याने ती वायर हटविण्याकरीता गैरअर्जदाराकडे विनंती अर्ज केलेला होता त्यानंतर गैरअर्जदाराने तक्रारकर्त्यास shifting charges भरावयास सांगितले आहे.

तक्रारकर्त्याचे म्हणणे की त्याची परवानगी न घेता श्री शालिकराम तिजारे यांना विद्युत जोडणी दिलेले आहे. सदर विज जोडणीसी त्याचा काहीही संबंध नसल्यामुळे तो shifting charges भरण्यास जबाबदार नाही.

गैरअर्जदाने तक्रारकर्त्याचा घरावरून केबल वळती करण्याचा निर्णय घेवूनही सदर केबल काढलेले नाही व तक्रार कर्त्यास shifting charges भरण्यास सांगितले, तक्रारकर्त्यास त्याचा प्लॉटवर घर बांधावयाचे असुन विद्युत वायरमुळे घराचे बांधकाम थांबलेले आहे. तक्रारकर्त्याने लवकरात लवकर न्याय मिळावा अशी विनंती केली आहे.

तक्रारकर्त्याने वेळोवेळी गैरअर्जदारास अनेक विनंती अर्ज केलेले आहे. परंतु त्याचा विचार न झाल्यामुळे सदर तक्रार अर्ज मंचासमोर दाखल केलेला आहे.

गैरअर्जदाराने त्यांचे लिखीत उत्तर दि. २७.०३.२०१० रोजी दाखल केलेले आहे. गैरअर्जदाराचे असे म्हणणे आहे की श्री तीजारे यांच्या पिठ गिरणीला 1974 पासुन विद्युत पुरवठा देण्यात आलेला आहे.

सदर वायर ही तक्रार कर्त्याच्या जागेतून गेलेली आहे हयापूर्वी तक्रारकर्त्याने सदर वायर बदद्ल आक्षेप घेतला नव्हता.

तक्रारकर्त्यास वायर हटविण्यासाठी लेखी अर्ज करून shifting charges भरण्यास सांगितले होते. तक्रारकर्त्याने केबल तार

स्थलांतरीत करण्यासाठी मोकळी जागा उपलब्ध करून नियमानुसार shifting charges चा भरणा केल्यानंतर कंपनीच्या नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

मंचाने दोन्ही पक्षाचे म्हणणे एकुण घेतले तक्रार कर्त्याने आपल्या अर्जासोबत जागेचा फोटो, ग्रामपंचायतीची कर भरल्याची पावती व काही Revenue रेकार्ड दाखल केलेला आहे.

तक्रारकर्त्याचे म्हणणे अतिशय साधे, सोपे व योग्य वाटते दोन्ही पक्षाचे कथनावरून ही गोष्ट स्पष्ट होते की तक्रार कर्त्याचा जागेतुन श्री तिजारे यांच्या पिठगिरणीची केबल वायर जात आहे.

तक्रार कर्त्यास स्वताचे घर बांधावयाचे असल्यामुळे सदर वायर हटविणे आवश्यक आहे. वायर हटविल्याशिवाय बांधकाम होवू शकत नाही हे गैरअर्जदाराने मान्य केले आहे, तसेच तक्रार कर्ता स्वता ही वायर काढुन टाकु शकत नाही, सदर केबल तार काढण्याचा अधिकार गैरअर्जदाराशिवाय कोणासही नाही.

गैरअर्जदाराने दाखल केलेल्या उत्तरात तसेच तक्रार कर्त्यास पाठविलेल्या दिनांक 31.07.2009 च्या पत्रात तक्रारकर्त्याने वायर हटविण्याकरीता लेखी अर्ज देणे, तसेच shifting charges भरणे आवश्यक असल्याचे म्हटले आहे.

गैरअर्जदाराने सदर मागणीच्या समर्थनार्थ कोणतेही नियम अथवा दस्तऐवज दाखविलेले नाहीत.

गैरअर्जदाराने हि बाब लक्षात घेतली नाही की तक्रार कर्त्याच्या प्लॉट वरून जाणारी वायर ही श्री तिजारे यांचा विज पुरवठयाला जोडलेली आहे, तक्रार कर्त्याचा सदर विज पुरवठयाशी काहीही संबंध नाही. या उलट सदर विज पुरवठयाने तक्रार कर्त्याच्या जागेत अतिक्रमण झालेले आहे. अशा परिस्थितीत तक्रार कर्त्याकडुन केबल हटविण्याकरीता लेखी अर्ज मागणे व त्याला shifting charges भरायला लावणे नियमाला धरून नाही.

वास्तविक पाहता गैरअर्जदाराने सदर समस्येत उपाय शोधने आवश्यक होते. ज्या व्यक्तीस विजपुरवठा दिलेला आहे. त्यावक्तीने विज

पुरवठयाकरीता किंवा पोल करीता जागा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. कोणत्याही परिस्थितीत प्लॉटवरून जाणारी वायर नियमाला धरून असु शकत नाही, तक्रार कर्त्याचा घरावरून जाणारी वायर ताबडतोब हटविणे आवश्यक आहे.

गैरअर्जदाराने तक्रारकर्त्यास जागा उपलब्ध करून देण्यासंबंधी म्हटलेले आहे. तक्रारकर्ता या करीता थोडी जागा देण्यास तयार आहे, गैरअर्जदाराने तक्रारकर्ता व त्याचे शेजारी श्री तिजारे यांच्या दोघांचा जागेतील खांबा करीता लागणारी प्रत्येकी अर्धी जागा घेवून खांब हटविल्यास समस्या दुर होवू शकेल असे मंचास वाटते.

दोन्ही पक्षाचे म्हणणे व त्यांनी दाखल केलेल्या कागदपत्राचा विचार केल्यावर या मंचाचे असे मत झालेले आहे की तक्रार कर्त्याच्या जागेवरील विज पुरवठा हटवून श्री तिजारे व तक्रारकर्ता यांच्या प्लॉटच्या मध्ये सोयीस्कर ठिकाणी पोल लावून सदर वायर हटविण्यात यावी.

## आदेश

सदर तक्रार अर्ज अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

गैरअर्जदाराने विद्युत पोल बसविण्याकरीता तक्रारकर्त्यास व श्री तिजारे यांच्या प्लॉट मधुन अर्धी – अर्धी जागा घेवून तक्रार कर्त्याच्या जागेवरील वायर हटविण्यात यावी.

गैरअर्जदाराला आदेश देण्यात येत आहे कार्यावाही बददलचा अहवाल या कार्यालयास 20.05.2010 पर्यंत सादर करण्यांत यावा

| | | |
|---|---|---|
| सही/– | सही/– | सही/– |
| (डी.जी. गावनार) | (श्रीमती गौरी चांद्रायण) | (श्रीमती मीरा खडक्कार) |
| सदस्य – सचिव | सदस्या | सभापती |

ग्राहक गा–हाणे निवारण मंच

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,

नागपूर शहर परिमंडळ, नागपूर.